| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 18 Feb 2026 | ‘पीएमएफबीवाय'ची दहा वर्षे आणि शेतकरी स्व यंपूर्णतेचे भविष्य डॉ. तपन सिंघेल, एमडी आणि सीईओ, बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेड (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी) | Kesari |

# ‘पीएमएफबीवाय'ची दहा वर्षे आणि शेतकरी स्वयंपूर्णतेचे भविष्य डॉ. तपन सिंघेल, एमडी आणि सीईओ, बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेड (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी)



भारत हा मुळात कृषी-प्रधान देश आहे. लाखो कुटुंबांसाठी शेती ही केवळ उपजीविका नसून गेल्या अनेक पिढ्यांचा वारसा आहे. भारताच्या विकासात शेतकऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याने आर्थिक समावेशन यावरील कोणत्याही चर्चेच्या केंद्रस्थानी प्रामुख्याने शेतकरी असणे स्वाभाविकच आहे; परंतु विरोधाभास म्हणजे, हवामान व उत्पन्नातील चढउतारांना सर्वाधिक सामोरे जाणाऱ्या याच घटकाचे संरचित आर्थिक जोखीम कव्हर मधील समावेशाचे प्रमाण अत्यल्प आहे. विमा विश्वात अनेकवेळा अनेकदा ‘प्रोटेक्शन गॅप' (सुरक्षितता तूट) बाबत नेहमी भाष्य केले जाते. भारतीय कृषी क्षेत्रात ही दरी प्रकर्षाने जाणवत होती. वर्ष २०१६ च्या पूर्वी पीक विम्याला सुरक्षिततेचा आधार न समजता बँक-केंद्रित क्लिष्ट औपचारिकतेच्या रूपात पाहिले जात असे. परंतु पंतप्रधान पीक विमा योजनेस (पीएमएफबीवाय) सुरुवात झाल्यापासून जुन्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल झाला आहे.

गेल्या दहा वर्षांच्या प्रवासात‘पीएमएफबीवाय' हे व्याप्ती आणि आर्थिक परिणाम या दोन्ही दृष्टीने जगातील सर्वांत महत्त्वपूर्ण कृषी जोखीम व्यवस्थापन कार्यक्रमांपैकी एक म्हणून विकसित झाले आहे. भारताच्या शेती व्यवस्थेत होत असलेल्या आमूलाग्र परिवर्तनाचे प्रतिबिंब दर्शवणारी ठोस आकडेवारीच या योजनेची खरी ताकद अधोरेखित करते. केवळ वर्ष २०२४-२५ मध्ये २३ राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमधील ४.१९ कोटींहून अधिक शेतकरी थेट विम्याच्या कक्षेत आले आहेत. म्हणजेच भारतातील जवळपास एक-तृतीयांश शेतकरी समुदायाने ‘पीएमएफबीवाय' वर विश्वास ठेवला आहे. या योजनेची सर्वांत मोठी उपलब्धी म्हणजे आज विमाधारक शेतकऱ्यांपैकी जवळपास ५५% शेतकरी हे बिगर-कर्जदार आहेत. म्हणजेच ते स्वेच्छेने सहभागी झाले आहेत. याचा अर्थ, शेतकरी या योजनेचे प्रत्यक्ष फायदे अनुभवत आहेत आणि केवळ कर्जाची अट म्हणून ती स्वीकारत नाहीत. योजनेचे जोखीम कव्हरेज देखील तितकेच व्यापक आहे. वर्ष २०२४-२५ मध्ये, अंमलबजावणी करणाऱ्या राज्यांमध्ये एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी ३५% क्षेत्र विमाबद्ध होते. ज्यामध्ये मागील वर्षांच्या तुलनेत लक्षणीय वाढ आहे. यामध्ये ८५% सहभागी शेतकरी हे लघु व सीमांत भूधारक असल्याने सर्वांत असुरक्षित घटकांचे संरक्षण करणारी ही योजना जागतिक पटलावर वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे. ही केवळ आकडेवारी नाही; याद्वारे सामाजिक समावेशन व समानता यावरील प्रभाव अधोरेखित होतो.

केवळ एवढ्यावरच मर्यादित नाही; महाराष्ट्रातील भीषण पूर किंवा कर्नाटकातील दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या प्रसंगी पीएमएफबीवायने शेतकऱ्यांसाठी प्राथमिक संरक्षण कवच म्हणून भूमिका निभावली आहे. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल

की, योजनेच्या प्रारंभापासून आजतागायत <१.९३ लाख कोटींपेक्षा अधिक क्लेम १०.८० कोटींहून अधिक शेतकऱ्यांना अदा करण्यात आले आहेत. यामुळे तीव्र पीक नुकसान आणि आर्थिक तणावाच्या काळात वेळेवर दिलासा मिळाला आहे. या प्रकारच्या क्लेम सेटलमेंटमुळे संकट काळातील कर्जावर अवलंबित्व कमी झाले. क्रेडिट शिस्त सुधारली आणि हवामानजन्य प्रतिकूल परिस्थितीत लाखो कुटुंबांना आधार मिळाला. राज्य सरकारांसाठी, ही योजना कृषी संकट हाताळण्यासाठी एक संरचित यंत्रणा उपलब्ध करून देते. राज्य निधीवर ताण आणणाऱ्या केवळ तात्पुरत्या आपत्ती निवारण निधीवर अवलंबून राहण्याऐवजी विमा-आधारित मॉडेलमुळे निधी पूर्वनिर्धारित आणि ॲयक्व्युअरली सुदृढ प्रणालीद्वारे वितरीत केला जातो.

क्लेम आणि कव्हरेज या पलीकडे जाऊन, या योजनेमुळे निर्माण झालेल्या सामाजिक व आर्थिक परिणामांवर चर्चा करणे तितकेच महत्त्वाचे आहे. बँका, सीएससी, विमा मध्यस्थ, ॲग्री-टेक कंपन्या, क्षेत्रीय गणक, हवामान केंद्रांची पथके आणि राज्यस्तरीय पीएमयू यांचा समावेश असलेल्या व्यापक अंमलबजावणी यंत्रणेमुळे ग्रामीण व निमशहरी भारतात हजारो नव्या रोजगारांची निर्मिती झाली आहे. या इकोसिस्टीममुळे स्थानिक पातळीवर डाटा संकलन, डिजिटल विस्तार आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय सेवा वितरणाची क्षमता अधिक बळकट झाली आहे. हळूहळू, पीएमएफबीवायमुळे तळागाळात विमा जागरूकता देखील वाढत आहे. पूर्वी विम्याकडे खर्चिक बाब म्हणून पाहणाऱ्या शेतकऱ्यांना आता 'जोखीम हस्तांतरण' या तत्त्वाची जाणीव होऊ लागली आहे. ही जाणीव परिवर्तनशील आहे. यामुळे भारताला व्यापक आर्थिक संरक्षणाच्या नव्या विश्वाची द्वारे खुली होतात- जसे की जीवनविमा, आरोग्य, ट्रॅक्टर, प्रॉपर्टी आणि पशुधन विमा.

पीएमएफबीवाय यशाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणजे तंत्रज्ञानाधिष्ठित परिवर्तन होय. एनसीआयपी डिजिटल इकोसिस्टीम, सॅटेलाईट-सहाय्यित उत्पन्न अंदाजासाठी येस-टेक, सीसीईॲग्री ॲप आणि विस्तारित विंड्स हवामान डाटा नेटवर्क यांसारख्या प्लॅटफॉर्ममुळे पारदर्शकतेसोबत वस्तुनिष्ठता वाढली आणि जलद क्लेम सेटलमेंट शक्य झाले. त्यामुळे डिजिटल कृषी विमा प्रणालीमध्ये भारताने जागतिक पातळीवर आदर्श निर्माण केला आहे. या व्यतिरिक्त, डिजिटल ॲग्रीकल्चर मिशन अंतर्गत ७.६३ कोटींहून अधिक फार्मर आयडीची निर्मिती करण्यात आली. २३.५ कोटी पीक क्षेत्रांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. ज्यामुळे कृषीसाठी व्यापक डिजिटल पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत. एआय आणि डाटा टूल्सचा वापर करून, हा उपक्रम वास्तविक वेळेत कीटक निरीक्षण आणि स्थानिक पातळीवरील मान्सून अंदाज सक्षम करतो. दुसरीकडे, किसान ई-मित्र चॅटबॉट सारख्या नवकल्पनांनी ११ प्रादेशिक भाषांमध्ये ९३ लाखांहून अधिक शंकांची उत्तरे देत देशभरातील शेतकऱ्यांच्या निर्णयक्षमता आणि कार्यक्षमतेत वाढ केली आहे. हवामानाशी संबंधित जोखमी वाढत असताना, पीएमएफबीवायच्या पुढील दशकात जोखीम प्रत्यक्षात येण्यापूर्वीच त्यांचा अंदाज घेण्यासाठी एआय-आधारित हवामान मॉडेलिंगवर भर देणे आणि प्रत्येक शेतकऱ्याला आर्थिक सुरक्षितता देण्यासाठी योजनेचे सार्वत्रिकीकरण करणे आवश्यक आहे.

विमा उद्योग जगताने २०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा या ध्येयाकडे वाटचाल करत असताना पीएमएफबीवायसारख्या योजना अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतील. त्या लाखो कुटुंबांसाठी त्यांच्या आयुष्यातील पहिल्या विमा अनुभवाचे प्रवेशद्वार ठरतील. पीक नुकसानीसाठी पारदर्शक प्रक्रिया आणि वेळेवर थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचा विमा व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होतो. परिणामी, ते अन्य विमा उत्पादने स्वीकारण्यास अधिक तयार होतात. अशा प्रकारे, पीएमएफबीवाय ही केवळ पीक विमा योजना न राहता सर्वसमावेशक आर्थिक सुरक्षिततेकडे नेणारे प्रवेशद्वार बनते आणि देशाला अन्न पुरवणाऱ्या हातांचे संरक्षण करत सार्वत्रिक विमा संरक्षणाच्या दिशेने भारताच्या वाटचालीला अधिक गती देते.